**CNR No.MHSI010005222026**

**अटकपुर्व जामीन अर्ज क्र. १०१/२०२६ ( महाराष्ट्र शासन वि.सुजय बी ) मधील नि.०५ वरील आदेश.**

१. प्रस्तुतचा अटकपुर्व जामीन अर्ज हा आरोपी सुजय बी यांने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८२(१) नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदारांविरुध्द कणकवली पोलीस ठाणे येथे दि.२३/१०/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (१),६१-१, २३८ अन्वये गुन्हा रजि. क्र. २९९/२०२५ दाखल करणेत आलेला आहे. अर्जदार यांचे विद्वान विधिज्ञांनी असे म्हटले आहे की, सदरचा गुन्हा अर्जदार यांचेविरुध्द खोटा व खोडसाळ दाखल केलेला आहे. अर्जदार यांचा गुन्हयात कोणताही सहभाग नाही. अर्जदार यांनी अटकपुर्व जामीन अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे अर्जदार यांना अंतरिम अटकपुर्व जामीन मंजूर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. अर्ज वाचला. अर्जासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार/आरोपी हे अलवट्टा , श्रीनिवासपुरा, राज्य कर्नाटक येथील आहेत. सध्या अर्जदार हे शिक्षण घेत असून त्यांची Bachelor of physiotherapy (B.P.T.)ची परिक्षा मे महिन्यात आहे. सदर परिक्षेचे रिसीट अर्जदार यांनी दाखल केले आहे. अर्जदार यांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यांना अटक झाल्यास त्यांनी दाखल केलेला मूळ अर्ज निष्फळ ठरणार आहे. मूळ अटकपुर्व जामीन अर्ज चालवून निकाल होणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे त्यांना अंतरिम जामीन मंजूर होणे आवश्यक आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

**आदेश**

पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे,कणकवली यांना असा आदेश देण्यात येत आहे की, अर्जदार/आरोपी सुजय बी यांना कणकवली पोलीस ठाणे

गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३ (१),६१–१, २३८ या शिक्षापात्र गुन्हयामध्ये अटक केल्यास त्यांनी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– (रक्कम रुपये पंधरा हजार मात्र/–) चा वैयक्तिक जातमुचलका आणि तेवढयाच रक्कमेच्या ऐपतीचा जामीन दिल्यास अर्जदार/आरोपी क्र.१ व २ यांस खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून पुढील तारीख पर्यंत जामीनावर मुक्त करणेत यावे.

१. अर्जदार/आरोपी यांनी साक्षीदारांवर कोणत्या स्वरुपाचा दबाव येईल असे कृत्य करु नये आणि पुराव्यात ढवळाढवळ करु नये.

२. तपासिक अधिकारी सूचना देतील त्यावेळी व त्याठिकाणी अर्जदार/आरोपी यांनी तपासकामाकरिता तपास अधिका–यांपुढे हजर रहावे व तपास अधिका–यांना पूर्ण सहकार्य करावे.

३. येणे प्रमाणे संबंधित पोलीस ठाणे यांना आदेश कळविणेत यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2026.05.08 17:34:24 +0530

सिंधुदुर्ग –ओरोस
दि.८/०५/२०२६

(व्ही.एस.देशमुख)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग –ओरोस.